# प्रकरण पाचवे

## `सांजवात` - वाङ्.मयीन गुणवत्ता

## प्रकरण - पाचवे

### 'सांजवात' - वाङ्‌मयीन गुणवत्ता --

### आनंदीबाईच्या 'सांजवात' या आत्मचरित्रातून आढळणारे वाङ्‌मयीन गुण विशेष --

आत्मचरित्राच्या तंत्रविषयक बाबींचा विचार करताना 'स्व' जीवन, तटस्थपणे न्याहाळून त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करून त्यांचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व' चित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र होय'.[1] अशी आत्मचरित्राची समर्पक व्याख्या होऊ शकेल अशा तऱ्हेचे मत डॉ. विमल भालेराव यानी जे दिले आहे ते योग्य वाटते. आत्मचरित्र ही 'स्वान्त सुखाय' लिहिली जातात. वेळ जावा, करमणूक व्हावी, आपला पराक्रम दुसऱ्यास सांगून भाराऊन टाकावे अशी स्वसुखाची अनेक परिमाणे असू शकतात आपले दुःख दुसऱ्याला सांगणे आत्मशोध घेणे, आत्मस्तोत्र गाणे, केलेल्या कृत्यांचा कबुली जबाब देणे आपल्या जीवनापासून दुसऱ्यांना कांही बोध होईल या बोधवादी हेतूने म्हातारपणाची जाणीव झाल्यावर स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याच्यादृष्टीने, उद्देशाने, अशा विविध हेतूनी आत्मचरित्र लिहिली गेली आहेत. आत्मचरित्राच्या बाबतीत ज्या प्रमाणे पहिल्याच प्रकरणात त्याच स्वरूपाचे महत्व सांगत असताना आत्मचरित्रात सत्यकथन, तटस्थवृत्ती 'स्व' ला केन्द्रस्थान, घटनांची योग्य निवड त्याची कुशल मांडणी, वस्तुस्थिति दर्शक निवेदन या आवश्यक बाबी आहेत. आत्मचरित्रात 'स्व' ला केन्द्रस्थान मिळणे

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

आवश्यक आहे. ही महत्वपूर्ण वैशिष्ट्ये लक्षात घेऊन ' सांजवात ' या आत्मचरित्राचे मूल्यमापन करताना वरील विशेष विशेषत्वानी जाणवताना दिसतात. आनंदीबाईंनी आपले गतकालीन जीवन, जीवनांतील घटना, स्मृति, संघर्ष आपल्या मुलाबाळांना समजावे म्हणून वयाच्या ऐंशिव्या वर्षी आपल्या मानवी जीवनाचा इतिहास स्वत:च्या उत्कट अनुभूतीच्या द्वारे सुलभ करून सांगितला आहे. त्याला भावनिकतेचा, लालित्याचा स्पर्श झाल्यामुळे तो इतिहास न राहता ती एक त्यांच्या जीवनाची कलात्मकरित्या हाताळलेली वाड्.मयीन कलाकृती साकार झाली आहे.

ललित साहित्याचा विशेष म्हणजे वाचकाला अंतर्मुख करणे. आत्मचरित्र हा वाड्.मय प्रकार मानवी मनाच्या आंदोलांना अधिक सूक्ष्मरित्या टिपण्याचा प्रयत्न करतो आहे. वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य चांगल्या आत्मचरित्रात असते त्या दृष्टीने डॉ. विमल भालेराव म्हणतात ' मानवी जीवनाचा अभ्यास करायला मोठे साधन म्हणजे आत्मचरित्र होय, मानस शास्त्राला त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो '[२] आत्मचरित्राच्या तंत्रबध्द चाकोरीत न गुरफटता प्रांजळपणे सहृदय पणे आपल्या जीवनाचे आत्मनिवेदन करून आनंदीबाईंनी ' सांजवात ' या आपल्या आत्मचरित्राला साहित्यिक मूल्य प्राप्त करून दिले आहे. खरं पाहता आनंदीबाईंचा मूळचा पिंड कलावंताचा आहे. त्या संदर्भात डॉ. ज्या नातू म्हणतात ' वयाच्या सोळाव्या सतराव्या वर्षी एका कर्तृत्व संपन्न, प्रतिभावंत तरुणीने आपल्या प्रकाशित कथेने लेखनास सुरवात केली. '[३] शिर्वाची अनुसया, आनंदीबाई म्हणून समाजा समोर प्रकाशमान होत राहिली. आनंदी या टोपण नावाने तिने कथा प्रसिध्द केली. इथून आनंदीबाईंच्या लेखनांतील बीजांचे स्फुट स्वरुपात दर्शन होऊ लागले.

...AJI UNIVERSITY...

## आनंदीबाईचे साहित्य --

'सांजवात' मध्ये आलेल्या लेखन विषयक माहितीतून आनंदीबाईंचा परिचय होतो. वर उल्लेखिल्याप्रमाणे प्रथम त्या 'कुमारी आनंदी' या टोपण नावाने लिहीत. त्यांच्या कथा, निबंध, 'मनोरंजन' 'मराठी मित्र' मधून प्रकाशित होत. त्यांचा पहिला कथा संग्रह 'कथाकुंज' हा होय. त्या काळात लेखन साहित्याची मागणी मनोरंजन मधून विशेषत्वाने होत असे. 'असेच लिहित जा मासिक तुमचे आहे' ( सांजवात पृ.११ ) हे मराठा मित्र चे सांगणे . आनंदीबाईंच्या कसदार लिखाणाची साक्ष पटवतात. त्या शिवाय 'कलादर्शन' मासिकाचे संपादकत्व, जळगांव मराठी साहित्य संमेलनाचे स्वागत-अध्यक्षपद हे सन्मान आनंदीबाईंचे एक साहित्यिक म्हणून त्याचे मोल दर्शविणारेच आहे. 'कथा कुंज', 'महाराजांच्या संगती', गुलाब जांब, 'तुणतुणे,' जुईच्या कळ्या,' 'साखरपुडा' हे कथा संग्रह उल्लेखनीय आहेत. त्यांची कथा प्रत्ययकारी स्वरूपाची आहे. कथा लेखनातील, भाषेतील गोडवा त्यातील वास्तवता, प्रसंग प्रधानता इत्यादी गुण उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणे 'विधवाशी खेळे बांगड्यावर बहिष्कार, बेगम दिल आरा, तिने आत्महत्या का केली ? ही लोकप्रिय कथा बीजे त्यांच्या जीवन जगण्याच्या वृत्तीतूनच निर्माण झालेली आहेत. म्हणूनच आनंदीबाईंच्या व्यक्तिमत्वाची उंची त्यांच्या साहित्य लेखनातून विशेषत्वानी पहावयास सापडते. शिवाय श्रीपादकृष्ण कोल्हटकर, वि.द.घाटे, माधवराव पटवर्धन यांच्या सारख्या थोर साहित्यिकांच्या सावलीत आनंदीबाई विसावल्या. त्यांच्या परिचयाने आणि सहवासाने आनंदीबाईंच्या अंतकरणातील साहित्यिक पिंड अधिकच जोपासला गेला. शिवाय बडोदा, इंदूर येथील साहित्य संमेलनातील आनंदीबाईंची उपस्थिति ही त्यांची साहित्य प्रेम दाखविणारीच आहे. त्यांच्या आत्मचरित्रात व साहित्य क्षेत्रातील त्यांच्या वावरण्याचे सगळेच उल्लेख विस्तारीत आलेले नसल्यामुळे त्यांच्या या पैलूची फक्त

ओळखच इथे होते. ' तत्वचिंतक, साहित्यिक, विनम्र आनंदीबाईंची प्रतिमा ' सांजवात ' मधून दृग्गोचर होताना दिसते. ' [४] विनम्रता हा आनंदीबाईंच्या व्यक्तित्वात जाणवणारा एक विशेष पैलू म्हणावा लागेल. त्या दृष्टीनेच ' सांजवात ' मधील व्यक्ति चित्रणे विचारांत घेता त्यांचे वैशिष्ट्ये लक्षात येते.

व्यक्ति चित्रणे --

' सांजवात ' मधून आनंदीबाईंचे साकार होणारे व्यक्तिचित्रण हे प्रकाशमान होत राहणारे आनंदीबाईंचे व्यक्तिमत्व आहे. स्वत:च्या जीवनातील चढ - उतार आपले आत्मचरित्र लिहून होईतोपर्यंत तितक्याच विनम्रतेने आणि प्रांजळपणाने लिहितात. त्या स्वत:च आपल्या पत्रात लिहितात ' आयुष्यात जसे घडले तसेच लिहिले ' [५] बालपणापासूनचे आनंदीबाईंचे जीवन सदृश आहे. लग्ना पूर्वीच्या आनंदीबाई व लग्नानंतरच्या आनंदीबाईंचा या आज्ञाधारक पत्नी, प्रेमळ माता म्हणून वावरतात. आनंदीबाईंचा स्वभाव जसा मायाळू तसा कठोर ही होता. ' कोणाचा कडू कठोर शब्द सोसण्याची सवय नव्हती. मानीपणाने एक प्रकारची हुकमत गाजविण्याची सवय होती. हुकूम ऐकण्याची नव्हती '. ( सांजवात - पृ. १२८ ) लहानपणापासून त्यांच्या मनाला एक विशेष शिस्त होती. याचा सविस्तर विचार पहिल्या प्रकरणात केलेलाच आहे पण वाङ्.मयीन गुणवत्ता ठरविताना त्यांच्या व्यक्तित्वाचे पैलू देखिल विचारांत घेण्याच्यादृष्टीने इथे थोडासा विचार करावा लागतो आहे. त्यांच्या व्यक्तित्वाला घडविण्यात त्यांच्या जीवनात आलेल्या इतर व्यक्ति सुध्दा कारणीभूत आहेत. त्यांच्या ही विशेषांचा गुण दोषासह उल्लेख आनंदीबाई तितक्याच प्रांजळपणानी करतात. त्यांच्या सहवासात आलेल्या व्यक्तिचे नेमके पैलू त्या टिपतात. त्या व्यक्तित्वाच्या भावचित्रामुळे आनंदीबाईंच्या व्यक्तित्वाची ' सांजवात ' प्रकाशित होण्यात अधिक

मदत होते. आनंदीबाईंच्या स्वभावाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांच्या जीवनात आलेल्या प्रत्येकांच्या स्वभावातील बारीक-सारीक टिपण्याची त्यांची शैली कांही आगळीच आहे. विशेष म्हणजे सूक्ष्म निरीक्षणाच्या सहाय्याने त्यांचे सांधे जुळवून घ्यायचे आणि ते व्यक्तिमत्व हाडामासाचे वाटेल असेच जिवंत करायचे ही एक आनंदीबाईंच्या निवेदनाची साधी लकब आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तींना देखील एक वेगळे अस्तित्व निर्माण होत गेले आहे. आनंदीबाईंचे आई,वडील जन्मदातेच पण वडिलांनी आनंदीबाईंना आपला मुलगाच मानले होते. आईची माया तिची समजावून घेण्याची पध्दत वैशिष्टयपूर्ण होती.बाबांची परिस्थिति आनंदीबाईंना अधिक विचारी बनवित होती. त्यामुळेच हुंडा घेणाऱ्या मुलाबरोबर न लग्न करण्याचा त्यानी कठोर निश्चय केला होता.तसे बाबांना पत्र लिहून ठेवले होते पण डॉ.बागवेंच्यामुळे अनुसया शिंदे आनंदीबाई शिर्के होते. शिवाय ही सामान्य स्त्री असली तरी एका प्रतिभावान शैलीमुळे ती शिवराम शिर्क्यांची सहधर्मचारीणी होते` समाज मोठा डोळा करून पहात असताना सुध्दा समाजाकडे दुर्लक्ष करून त्यानी शिर्क्यांशी लग्न करणे हे त्याचे धाडस तत्कालीन समाजास असामान्य वाटते.` [६] त्यांचे वडील शिंदे घराण्यातले असले तरी प्राप्त परिस्थितीत त्यांना संसार हाकणे कठीण झाले होते. या साठी वर उल्लेखल्याप्रमाणे,लग्नात हुंडा न देण्याचा त्यांचा निश्चय होता.तसा नर्सिंग कोर्स शिकून आपल्या वडिलांच्या खिळखिळ्या झालेल्या संसार संकटाला आधार देण्याचा त्याचा उदात्त हेतू होता. म्हणून त्या म्हणतात `आई बाबांचे म्हातारपण सांभाळण्यासाठी मुलांसारखी जबाबदारी आपणच घेतली पाहिजे.आणि ते नर्सिंग शिकून साधेल लग्न करून साधणार नाही.` ( सांजवात - पृ.३३२ ) अशी आनंदीबाईंची ठाम समजूत होती. पण आनंदीबाई परिस्थितिमुळे आपल्या निश्चयाच्या बाजूला जाऊन शिर्क्यांच्या जीवनात प्रवेश करतात आणि` या पुढं ह्यांच्या मर्जीप्रमाणे वागलं पाहिजे. आपल्या मतांना मुरड घातली पाहिजे` ( सांजवात -- पृ.७९ ) असे त्या म्हणतात.

आनंदीबाईंच्या जीवनाची छटा तिच्या लग्नानंतर बदलते आणि भारतीय स्त्री ला साजेशी अशी पतीकडून प्रतिमा यातून उभी राहते. आनंदीबाईंना सासरी त्रास होतो पण तो त्रास भारतीय संस्कृतीतील स्त्री महिम्याप्रमाणे मुकाट्याने सहन केला जातो. तिथे सवलती मागितल्या जात नाहीत. त्या संदर्भात आनंदीबाई म्हणतात`आपणाहून सवलत मागण्याची मला सवय नव्हती`( सांजवात -- पृ.१९२ ) आनंदीबाईंच्या मानिनी पणाची कल्पना येते`पण त्याचबरोबर सहधर्मचारिणीचे विशेष ही त्यांच्या व्यक्तिमत्वातून जाणवून येतात.` शिर्के पती पत्नीनी एकमेकांना समजून घेतले होते. पती पत्नी मधील परस्परावरील प्रीती, एकमेकांवरील विश्वास संसार सुखाला कारण ठरतो. शिर्के सारख्या स्वभावाला वेगळे कंगोरे असणाऱ्या पती बरोबर आनंदीबाईंनी एखाद्या सावली सारखी साथ केली.अख्ख्या कुटुंबावर मायेची शाल पांघरली`[७] आपल्या सहजीवनातील काही प्रसंग आनंदीबाईंनी आपल्या चित्रमय शैलीने स्पष्ट केले आहेत,` शिवराम शिर्के मृदुमवाळ तर आनंदीबाई उत्कट आणि करारी ? आनंदीबाई कुदळीला कुदळ म्हणणाऱ्या तर शिवराम शिर्के शांती ब्रम्ह अगदी तुकाराम बुवा` असे विठ्ठलरावानी जे वर्णन केले त्यातून आनंदीबाईंच्या स्वभावाचा पैलू लक्षात येतो.[८] आनंदीबाईंच्या सारख्या धीराची निग्रही प्रेमळ स्त्री ही कुटुंबाचा खराखुरा आधार असतो. आनंदीबाई आपल्या आत्मचरित्रातून आपल्या स्मृतिकोषातील अनुभवांना गोचर करुन पाहतात. गत जीवनाचे गाठोडे सोडून त्यातील एकेक आठवण हळुवार शैलीतून सांगतात त्या लिहितात`संध्याकाळी देवापुढे` सांजवात`लावून बसते तेव्हा साहजिकच गतजीवनाचे सिंहावलोकन होते. सिंहावलोकन करीत असता आनंदीबाईचे मन अंतर्मुख होते. आयुष्यात कळत न कळत हातून घडलेल्या चुका, प्रमाद इत्यादी सारे आठवते सुखदु:खाचे प्रसंग फुलवून मन सुखावते दुखावते डोळ्याद्वारे वाहू लागेत.`

आनंदीबाई काही एक दु:ख प्रसंगही तितक्याच अलिप्तपणे करुण रसाशी समरस होऊन टिपतात उदाहरणार्थ नागपंचमी पासून कृष्णजन्माष्टमी पर्यन्त शिर्क्यांचा शरद तापाने भाजून निघाला आणि और काळाने त्याच्यावर झडप घातली या घटनेने शिर्के कुटुंब अक्षरशः उन्मळून गेले. आनंदीबाई लिहितात लोकांच्या घरी कृष्ण जन्म झाला आणि आमचा कृष्ण देवा घरी गेला. आईबापाचा निरोप न घेता किती हतभागी आम्ही ( सांजवात - पृ. २७७) मनांतील आशयाला बोलकं करण्याचं सामर्थ्य त्यांच्या शैलीत आहे, त्यांच्या जीवनाला उठाव देणारी इतर व्यक्तिचित्रे देखील पूरक ठरली आहेत. आनंदी - बाईच्या इतर बहिणी, आईवडील, सासू, सासरे, दादा त्यांची मैत्रिण, मुले, श्रेष्ट साहित्यिक वि.द.घाटे, लक्ष्मीबाई टिळक ,कोल्हटकर, वि.रा.शिंदे या थोरांच्यामुळे आनंदीबाईच्या जीवनाला अधिकच उत्कटता प्राप्त होत गेली आहे. आनंदीबाईच्या उमलणाऱ्या जीवन वेलीला बाकी सर्वांनी अधिकच प्रोत्साहन दिले आहे. आपल्या जीवनातील काही प्रसंगाच्या सहाय्यांनी त्यानी अधिकच जोपासना केली. त्यात प्रेम कथेचे जल शिंपडले त्या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात आपल्या निवेदनातून त्या जशा आपल्या कुटुंबात वावरणाऱ्या लहान मोठी व्यक्ति चित्रे रेखाटतात तशी त्या कुटुंबाशी मित्रत्वाने वागणाऱ्या माणसाची चित्रे ही रेखाटतात[१०] स्वत: आनंदीबाई म्हणतात माझ्या जीवनात माझ्या जवळ ज्या ज्या व्यक्ति आल्या मला भेटल्या, काही संस्कार करुन गेल्या त्यांच्या चारित्र्याने, शिकवणीने आणि त्या न कळत त्यांच्यापासून घेतलेल्या संस्काराने माझ्या जीवनाची जडण घडण झाली आहे. [११] शिवराम शिर्के जीवनाचे सोबती फारशा न शिकलेल्या मातापितराशी समरस होतात. शिर्के मुलामध्ये मूल बनतात, विविधरुपे चित्रित करतात. दादांचे व्यक्तिचित्रण थोडे कठोर आहे. तसे हुकूमाचे ही आहे. स्वतंत्र जीवन जगणारे दादा नोकरी म्हणजे गुलामगिरी मानतात बहिणीला आलेले पत्र फाडून वाचूनच मग देतात त्यांचा

स्वभाव तसा लहरी पण शिस्तीचा. स्त्रियांनी शिकले पाहिजे असे म्हणणारा क्वचित प्रसंगी पत्नीला मारूनही शिकवण्याची धडपड करणारा असा त्यांचा स्वभाव.कांही मिश्रणांनी बनला होता' आमचे दादा कधीकधी इतके कठोर बनत की करुण प्रसंग वाचताना ते गहिंवरतात हे कुणाला खरे सुध्दा वाटू नये. त्यांच्या स्वभावाची ठेवण' वळले तर सूत नाही तर भूत अशी होती' ( सांजवात - पृ. २६३ ) ते मदत करीत उदारकर्त्यांच्या जोडीला खोडकरपणा व फटकळपणाही होताच. लहानपणापासूनच आनंदीबाईंच्याकडून पुस्तक वाचून घेत तर शिर्के आणि आनंदीबाईंचा संसार जुळवून देणारे डॉ.बागवे शिर्के कुटुंबाच्या पाठीशी पहाडा सारखे उभे राहणारे, त्यांच्यावर माया करणारे तुमच्या घरात गोष्टा आहे की काय ? असे मिस्कीलपणे म्हणणारे श्री विठ्ठल घाटे,संग्राम गीते लिहिणारे श्री. तिवारी, आनंदीबाईंच्या लेखनाचे कौतुक करणारे तात्यासाहेब कोल्हटकर आणि लक्ष्मीबाई टिळक या सारख्या कितीतरी व्यक्ति रेखा या आत्मचरित्रात वावरताना दिसतात. ही व्यक्तिचित्रे म्हणजे आनंदीबाईंच्या जीवनाचे कुटुंब चित्रच म्हणता येईल या व्यक्ति म्हणजे या ना त्या नात्याने आनंदीबाईंच्या जीवनात बांधलेल्या आहेत. स्वत: आनंदीबाई म्हणतात' सुखात जसे सोबती होते तशी संकट काळी ही मी एकटी एकाकी नव्हते बळकट बाहूचे पाठीराखे होते. आप्त स्वकीय,मित्रपरिवार मदतीला होता.[१२]

शैली --

आत्मचरित्र' स्व' चे चरित्र असले तरी आनंदीबाईंनी आपल्या जीवनातील घटना प्रसंगांना नेमक्या शब्दांतून साकार केले आहे. त्याला परिणामकारकतेची जशी जोड दिली आहे त्याप्रमाणेच स्त्री सुलभ भावमयते मुळे त्याला अधिकच लालित्य प्राप्त होत गेले आहे. प्रासादिक लिखाणात आशय आणि अभिव्यक्तीची फारकत होताना कधी दिसत नाही .आनंदीबाई लिहिताना

` दादा घरात दिसत नाहीत असे पाहून पानांचा बोकणा भरलाच तर न बोलताच जीभ व तोंड चहाडी करीत ` ( सांजवात -- पृ. २७ ) चोरी पकडली गेल्याची ही भीती सुंदर अभिव्यक्ती झाली आहे. तर नकळत त्या वयाचे वर्णन ` माझी हे अर्धे कच्चे ल्हान वय ` ( सांजवात -- पृ. ४९ ) तसेच ` लोकांच्या घरी कृष्ण जन्म झाला आणि आमचा कृष्ण देवा घरी गेला . आई बापाचा निरोप न घेता किती आम्ही हतभागी अशा नेमक्या शब्दांतून करुणा रसाचा भाव व्यक्त करणं, तसेच मनातील आशयाला बोलकं करण्याचं सामर्थ्य आनंदीबाईंच्या शैलीत आहे. त्या व्यथांना समर्थपणे साकार करतात ` मुलं सशासारखी दूर दूर गप्प असत तेव्हा दुःखात तरी किती बुडायचं ` याचा समजुतदारपणा आनंदीबाईंच्या जवळ आहे ` जो गेला त्याचा शोक होणारच ` पण तो आता कधी परत येणार नाही ना । त्यांच्या शोकामुळे जी आहेत त्या मुलांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. जे दुःख वाट्याला आले ते बिन तक्रार स्विकारायचे, हिंम्मत बांधून त्या दुःखातून वाट काढायची ` अशी एक समंजसवृत्ती आनंदीबाईंनी बाळगली होती असे किती तरी बोलके प्रसंग आत्मचरित्रात आहेत. या आत्मचरित्राला कलात्मक पातळी साधली आहे. तर म्हणींच्या मुळे देखील थोडक्यात भावभावनांना साकार केले आहे.

` लाच कधी घेऊ नये नक्षाला कधी मुलू नये ` ( सांजवात - पृ. २० )

` ऐशी कळवळ्याची जाती । लाभा विना करी प्रीती ` ( सांजवात - पृ. ३३ )

` बाजारांत तुरी नि भटभटणीला मारी ` ( सांजवात - पृ. १४४ )

` दुसऱ्याच्या घरावर तुळी पत्र ठेवणारे ( सांजवात - पृ. ६३ )

` सोन्याची सुरी झाली तरी उरात खुपसून घ्यायची नसते ` ( सांगवात पृ. ११४ )

` कुठे जातोस भोगा तर तुझ्या पुढ उभा ` ( सांजवात । पृ. २३५ )

` पळस गेला कोकणा तरी त्याला पाने तीन ` ( सांजवात - पृ. २५५ )

` कर नाही त्याला डर कसली ` ( सांजवात - पृ. २८३ )

` घर पहावे बांधून ` ( सांजवात - पृ. ३२० )

` वळले तर सूत नाही तर भूत ` ( सांजवात - पृ. २६३ )

अशा या म्हणींच्यामुळे भाषा शैलीला अधिकच सौंदर्य प्राप्त झाले आहे. शैली म्हणजे बोलणे, तसे लिहिणे तेही साध्या सरळ भाषेत लिहिताना कधी आनंदीबाई स्वयंपाक खोलीचा आधार घेतात तर कधी अंतःकरणाच्या ओघात तर कधी मनोविकारांच्या सहाय्याने तर कधी चेहरे पट्टीच्या मापाने तर कृती उक्तीच्या निरीक्षणाने व्यक्तिचित्रे रेखाटलेली आढळतात. आनंदीबाईंच्या शैलीचा तो एक खास विशेष म्हणावा लागेल. त्यामुळे आनंदीबाईंच्या ' सांजवात ' आत्मचरित्राला स्त्री आत्मचरित्राच्या मालेत बरेच वरचे स्थान मिळालेले आहे. जाता जाता या आत्मचरित्राच्या अनुषंगानी लेखिका जवळ आवश्यक असणाऱ्या गोष्टी बाबत आनंदीबाई लिहितात ' स्मृति चित्रात काकूंनी ( लक्ष्मीबाईंनी ) फार मोठी तपश्चर्या केली होती, त्यांचे चिरंजीव देवदत्त यांनी काकूंना एक लेखनिक मुलगी दिली होती. पहाटे उठून काकू प्रातर्विधी उरकून दोघींचा स्वयंपाक करीत नंतर त्या आपल्या खोलीचे दार आतून लावून घेत. सूर्यास्ता नंतर उघडीत. दिवस भर खोलीत लेखन वाचन चाले. मध्ये जेवणाची काय ती थोडी सुट्टी. आजचे किती लेखक नि लेखिका परिश्रमाचा असा पत्थर फोडतात ' ( सांजवात - पृ. २७१ ) आनंदीबाईंनी क्याच्या पेंशिच्या कर्षी लिहिलेल्या आत्मचरित्राला मराठी साहित्यात वरचे स्थान मिळाले आहे. या संदर्भात रविंद्र पिंगे म्हणतात ' अशा पुण्यशील लेखिकेने आपल्या एंशीच्या वर्षीचा उन्हा-पावसाचा आलेख ' सांजवात ' रूपाने मागे ठेवला आहे. मराठी साहित्यातल्या बावन्न कशी धनात त्याची जमा आहे. लेखन अभिजात साहित्यात जमा झाले आहे. असे पुस्तक वाचणे म्हणजे समाधानाच्या तळ्याकडे जाणे ' [13]

आनंदीबाईंच्या कन्या सौ. सुधाताई सावंत म्हणतात ' आपली आई काळाच्या पुढे होती ' असे सतत वाटत राहते. आपल्या आईने साहित्यिक, व्याख्याती, आई व गृहिणी अनेक पदरी भूमिका जबाबदारीने समरसतेने केल्याने त्यांना समाधान वाटते. [14] अशा या आनंदीबाई शिर्केंचा मानसन्मान मोठा

झाला. १९३६ साली जळगांव मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून त्याना मान मिळाला .पंच्याण्णवव्या वर्षी महाराष्ट्र शासना तर्फे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. तर सुंदर माझे घर या साठी मुलाखत झाली. अशा मान सन्मानानी विभुषित झालेल्या आनंदीबाई शिर्के यांनी लावलेली 'सांजवात' अजूनही मराठी साहित्यात संथपणानी प्रकाशित राहिलेली आहे हेच या आत्मचरित्राचे कलात्मक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'आलोचने' मध्ये वसंत दावतरानी या आत्मचरित्राचा गौरव केला आहे. आपल्या आकांक्षा रेषा आपल्या कृतीनी व उक्तीनी त्या त्या प्रसंगावर नियतीच्या ललाट रेषा सारख्या उमटून ठेवताना आढळतात, वैयक्तिक आणि सामाजिक पार्श्वभूमीची अंगोपांगेही या रेषांना पूर्णत: ठळकपणा आणून देतात. आत्मकथा निवेदिकेच्या कांक्षा-आकांक्षा आणि वास्तवता यांच्या मधील छेद, ताण, विरोध आणि समन्वय यांचे संप्रमाण या चित्रात होते. आणि संक्रमण कालीन सामाजिक जीवनातील कौटुंबिक जीवनाचे परस्परात गुंतलेले धागे, दोरे वास्तव स्तरावर वाचकाला उलगडत जातात आणि निवेदिकेच्या जीवन चित्रात त्यांचा एक प्रभावी संघाती गोफ विणलेला वाचकालाही प्रतित होतो. जाणिवेच्या या स्तरावरील हे एक समर्थ आत्मचरित्र .[१५]

मराठी आत्मचरित्राच्या परंपरेला तिच्या मर्यादासह जागवणारे हे आत्मचरित्र आहे असे म्हणाव्यास हरकत नाही.

# संदर्भ


१ डॉ. विमल भालेराव पृ.क्र. २४४

आधुनिक मराठी वाङ्.मयातील स्त्रियांची

आत्मचरित्रे : एक अभ्यास

साहित्य प्रचार केन्द्र, नागपूर, प्र.आ. २५ मार्च, १९८६.

२ -- तत्रैव - पृ.क्र. २४५

३ डॉ. जया नातू । दैनिक पृ.क्र. ७

तरुण भारत ( बेळगांव )

ता. २६ मे १९९३.

४ डॉ. विमल भालेराव पृ.क्र. १६१

आधुनिक मराठी वाङ्.मयातील स्त्रियांची

आत्मचरित्रे : एक अभ्यास

५ आनंदीबाई शिर्के पृ.क्र. २६०

`सांजवात` आधुनिक मराठी वाङ्.मयातील

स्त्रियांची आत्मचरित्रे एक अभ्यास

६ डॉ. विमल भालेराव पृ.क्र. १५५

आधुनिक मराठी वाङ्.मयातील स्त्रियांची

आत्मचरित्रे : एक अभ्यास

७ भालचंद्र फडके पृ.क्र. १६६ । १६७

`मराठी लेखिका चिंता आणि चिंतन

श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ३०

प.आ. मार्च १९८०

८ वि.द.घाटे । `सांजवात` पृ.क्र.११
( आत्मचरित्र ) प्रस्तावना
मौज प्रकाशन ,२१०
मौज प्रकाशन गृह,मुंबई, प.आ.जून १९७२

९ भालचंद्र फडके पृ.क्र.१६५
`मराठी लेखिका चिंता आणि चिंतने

१० - तत्रैव - पृ.क्र.१६७

११ आनंदीबाई शिर्के (सांजवात ) (आत्मचरित्र ) पृ.क्र.३३३
मौज प्रकाशन,२१०,मौज प्रकाशन गृह मुंबई,
प.आ. जून १९७२

१२ भालचंद्र फडके
मराठी लेखिका चिंता आणि चिंतन पृ.क्र.१६८
श्री विद्या प्रकाशन २५०,शनिवार पेठ,
पुणे ३०, प.आ.मार्च १९८०.

१३ रविंद्र पिंगे पृ.क्र.२
`सांजवात` सोज्वळ आत्मचरित्र`
दैनिक` तरुण भारत` ( बेळगांव )
दिनांक २९-५-१९९३.

१४ सौ.सावंत सुधा पृ.क्र.७
आनंदीबाई शिर्के, एक पुण्य स्मरण`
दै.तरुण भारत ,( बेळगांव )
२६ मे १९९३.

१५ वसंत दावतर । आलोचना
महाराष्ट्र राज्य
सांस्कृतिक पुरवणी
३३३ शेफाली
मकरंद सह निवास १०७४ पृ.क्र. ३३
` स्वा` सावरकर मार्ग ,मुंबई १६
एप्रिल १९७३.